‘आई राजा उदे उदे’च्या जयघोषात चैत्र पौर्णिमेनिमित्त तुळजापुरात जनसागर लोटला

हजारो भाविकांनी घेतले श्री तुळजाभवानीचे दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

तुळजापूर (जि. धाराशिव) : ‘आई राजा उदे उदे, सदानंदीचा उदे उदे’ अशा आसमंत उजळून टाकणाऱ्या जयघोषात आणि हलगी-झांजांच्या कडकडाटात बुधवारी तुळजापूर येथे चैत्र पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी झाली. आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी कोनाकोपऱ्यातून हजारो भाविकांनी तुळजापुरात हजेरी लावली होती.

चैत्र पौर्णिमेनिमित्त तुळजाभवानी मंदिर रात्री एक वाजता उघडण्यात आले. सकाळचे पंचामृत अभिषेक, पूजा झाल्यानंतर नित्योपचार धार्मिक विधी पार पडले. दरम्यान, महंत भोपे पुजारी बांधवांनी तुळजाभवानीची चैत्र पौर्णिमेनिमित्त विशेष अलंकार महापूजा मांडली.

बुधवारी चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री तुळजापुरात राज्याच्या विविध भागांतून भाविकांनी अशी गर्दी केल्याचे दिसून आले.

यानिमित्त पुणे येथील देवी भाविक प्रवेश पेठकर यांनी सिंहासनाला विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांनी व फळांची सजावट केली होती. दरम्यान, सायंकाळी अभिषेक पूजा झाल्यानंतर तुळजाभवानीचा छबिना काढण्यात आला आणि महंताच्या जोगव्याने पौर्णिमेची सांगता करण्यात आली.

यावेळच्या यात्रेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे खासगी आलिशान गाड्यांपेक्षा खासगी टेम्पोने गटागटाने येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी होती.

प्रशासनाकडून सुविधांचा ‘थंडावा’

उन्हाचा तडाखा लक्षात घेता, मंदिर संस्थानने भाविकांसाठी विशेष सोयी केल्या होत्या.

यात प्रामुख्याने बीडकर तलाव पायऱ्यामार्गे भाविकांना प्रवेश दिल्याने त्या ठिकाणी भाविकांसाठी पादत्राणे ठेवण्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

त्याबरोबर परतीच्या मार्गावर महाद्वार ते सोनेश्वर मंदिर या भवानी रोडवर कपडा मारून भाविकांना सावली करण्यात आल्याने भाविकांचे दर्शन अधिक सुसह्य व सुलभ होत होते.

“ पौर्णिमा बुधवारी सायंकाळी सातनंतर लागली असून, ती गुरुवारी सायंकाळी सात वाजता संपणार आहे. त्यामुळे परंपरेनुसार देवीचा छबिना आणि महंताचा जोगवा हे विधी पौर्णिमेच्या पहिल्या दिवशी म्हणजेच बुधवारी पार पाडण्यात आले.

- अमोल भोसले, धार्मिक व्यवस्थापक, मंदिर संस्थान

येरमाळ्यातही गर्दी

श्री तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून ओळख असलेल्या येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रोत्सवास २ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.

या निमित्ताने बुधवारपासूनच भाविक येरमाळानगरीत दाखल होत आहेत. भाविकांच्या गर्दीने येडेश्वरी मंदिराकडे जाणाऱ्या मार्गासह मंदिर परिसरही फुलून गेला आहे. यात्रेतील प्रमुख चुनखडी वेचण्याचा सोहळा ३ एप्रिल रोजी असून, यात दरवर्षी राज्यातून दहा लाखांपेक्षाही अधिक भाविक सहभागी होतात.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

महाराष्ट्र शासन अंगीकृत

ई-निविदा सूचना क्र. / ३५/ सन २०२५-२०२६ करिता शुद्धिपत्रक क्र. १

दिनांक २५/०३/२०२६ रोजी दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर (जिल्हास्तरीय) या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या निविदा सूचना क्र. ३५, सन २०२५-२०२६ मधील खालील कामांच्या काही तांत्रिक कारणामुळे त्यांच्या प्रसिद्ध करण्याचा, उपलब्धतेचा व देकार सादर करण्याचा कालावधी बदलण्याबाबत शुद्धिपत्रक देण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम रुपये	ई-निविदेचा वाढविण्यात आलेला कालावधी	
			पासून	पर्यंत
क	कार्यकारी अभियंता, मऔविम, स्थापत्य विभाग, छत्रपती संभाजीनगर			
१	अतिरिक्त शेंद्रा (जयपूर) औद्योगिक क्षेत्र ..... अतिरिक्त शेंद्रा (जयपूर) औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सोई-सुविधांची स्थापत्य व विद्युत विषयक विकास कामे करणे.	३१,५२,१९,९११/-	३०/०३/२०२६	२३/०४/२०२६

निविदा सूचना अगर निविदा सूचनेतील कोणताही भाग कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा राखून ठेवण्याचा, तसेच सुधारणा करण्याचा हक्क म.औ.वि. महामंडळाने राखून ठेवला आहे. ई-निविदा प्रक्रियेकरिता महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा संकेतस्थळ (https://mahatenders.gov.in) येथे भेट द्यावी.

विश्वासाचे अतूट नाते

दि जळगाव पीपल्स को-ऑप.बँक लि.

(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक) १९३३ पासून

दिशा प्रगतीची-साथ विश्वासाची

एकत्रित व्यवसाय

₹3605 कोटी

आर्थिक आलेख 31 मार्च 2026 अखेर (रुपये कोटीत)

तपशील	2024-25 (लेखापरिक्षित)	2025-26 (अलेखापरिक्षित)	वाढ/घट %
ठेवी	1977.42	**2170.49**	9.76% ↑
कर्जे	1260.32	**1434.67**	13.83% ↑
एकत्रित व्यवसाय	3237.74	**3605.16**	11.35% ↑
सीडी रेशो	63.74%	**66.10%**	↑
ढोबळ एनपीए%	4.82%	**3.41%**	↓
नक्त एनपीए%	1.92%	**1.66%**	↓
नफा	14.38	**23.48**	63.28% ↑

बँकेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचे मनःपूर्वक आभार!

रजिस्टर्ड ऑफीस : 152, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगाव 425001. फोन 0257-2227711-16. टोल फ्री नं. 18002331385. www.jpc.bank.in | jaljpcb@jpcbank.com

24 x 7 Support customercare@jpcbank.com 0257- 2272813

जळगाव । धुळे । नंदूरबार । नाशिक । पुणे । नवी मुंबई । कल्याण व डोंबीवली । कोल्हापूर । छत्रपती संभाजीनगर । बुलढाणा । अकोला । अमरावती । बऱ्हाणपूर (मध्यप्रदेश)

कांद्याचे दर कोसळले, खर्चही निघेना; शेतकऱ्याने पिकावर नांगर फिरवला

आखाती देशात पेटलेल्या युद्धाची झळ; निर्यात ठप्प

लोकमत न्यूज नेटवर्क

काक्रंबा (जि. धाराशिव) : आखाती देशात पेटलेल्या युद्धाची झळ कांद्यालाही मोठ्या प्रमाणात बसली आहे. स्थानिक बाजारपेठेत दर कोसळल्याने काढणी अन् वाहतूक खर्चही पदरी पडत नसल्याने तुळजापूर येथील एका शेतकऱ्याने उभ्या पिकावर मंगळवारी नांगर फिरवला. यामुळे लागवडीवर केलेला मोठा खर्चही वाया गेला आहे.

तुळजापूर येथील रहिवासी असलेले बाळासाहेब रोचकरी यांची काक्रंबा शिवारात शेती आहे. गेल्या दहा ते बारा वर्षांपासून ते आपल्या शेतात कांदा पीक हे प्रामुख्याने घेत असतात. याही वर्षी त्यांनी कांद्याची पावणेदोन एकर क्षेत्रात लागवड केली होती. लागवडीपासून खतांच्या मात्रा, पाण्याची पाळी, निंदणीसह आतापर्यंत जवळपास ७० ते ७५ हजार रुपयांचा खर्च केला. खरिपातील कांद्याला भाव मिळाला नव्हता. आता किमान रब्बीच्या कांद्याला तरी भाव मिळेल, या आशेने रोचकरी यांनी मोठ्या मेहनतीने कांदा वाढवला.

दरम्यान, काढणीला सुरुवात होण्यापूर्वीच बाजारपेठेत कांद्याचे दर कोसळले आहेत. प्रतवारीनुसार प्रतिक्विंटल २०० ते ५०० रुपयेच दर मिळत आहे. या दराने कांदा

“ मी दरवर्षी कांदा पीक घेतो. कधी चांगला भाव मिळतो तर कधी लागवडीचा खर्चच हाती लागतो. मात्र, यावर्षी दर खूप कमी झाल्याने काढण्याचा खर्चही निघाला नसता. त्यामुळे उभ्या पिकावर नांगर चालवला. शेतकऱ्याला शासनाने कुठलीही मदत देण्यापेक्षा त्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्याची गरज आहे.

- बाळासाहेब रोचकरी, शेतकरी

विकल्यास काढणीचाही खर्च निघणार नाही. त्यामुळे रोचकरी यांनी चक्क पावणेदोन एकरातील कांद्यावर मंगळवारी नांगर फिरवला. लागवडीपासून ते काढणीपर्यंत शेतकरी मोठ्या आशेने उसनवारी, व्याजाने पैसे घेऊन खर्च करतो. मात्र, शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत दाखल होताच भाव गडगडतात, अशी स्थिती सातत्याने निर्माण होत आहे.

अर्धापूरमध्ये केळीचे घड टाकले जनावरांसमोर

लोकमत न्यूज नेटवर्क

पार्डी (जि. नांदेड) : अर्धापूर तालुका हा केळी उत्पादनासाठी प्रसिद्ध असून, ७० ते ८० टक्के क्षेत्रावर केळीची लागवड झाली आहे. सध्या पाच ते दहा टक्के शेतकऱ्यांची केळी काढणीस आली आहे. मात्र, बाजारपेठेत केळीला कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर आता केळीच्या दरातील मोठी घसरण आणखी गंभीर समस्या ठरत आहे.

गतवर्षी मे महिन्यात लागवड केलेली केळी एप्रिल महिन्यात काढणीस आली असताना अपेक्षित दर मिळत नाही. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी केळीचे घड काढून ठेवले असले, तरी व्यापारी खरेदीकडे पाठ फिरवत असल्याने अनेक ठिकाणी केळी शेतातच पिकून जात आहेत. काही शेतकरी नाईलाजाने केळीचे घड कापून जनावरांना चारा म्हणून टाकत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तालुक्यातील केळी चविष्ट व स्वादिष्ट असल्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्यात होते. मात्र सध्या इराण-अमेरिका युद्धामुळे आखाती देशांमध्ये होणारी केळी निर्यात बंद झाली असून, याचा फटका केळी उत्पादक शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. गतवर्षी मे महिन्यात केळीला २१०० ते २५०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत होता. मात्र, यंदा तोच दर घसरून केवळ ३०० ते ४०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत आला आहे.

प्रति क्विंटल ४०० रुपये मिळत असल्याने नुकसान

अर्धापूर तालुक्याच्या शेजारील गावातील दोन शेतकऱ्यांनी ४०० रुपये दर मिळत असल्याने चार-चार हजार काढणीस आलेले केळीचे घड जनावरांना कापून टाकले.

यामुळे संबंधित शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा फटका बसला आहे. गतवर्षी अर्धापूर तालुक्यातून आखाती देशांत लाखो टन केळीची निर्यात झाली होती.

मात्र, यंदा काढणीच्या सुरुवातीपासूनच निर्यात थांबल्याने केळीचे दर अक्षरशः कोसळले असून, केळी उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

संवाद ठेवा, एकत्र या... प्रबोधनवाणी ठरली शेवटची; घरी जाताना अपघाती मृत्यू

विशेष

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : समाजात एकता आणि संवाद यांचे महत्त्व अधोरेखित करत, एकत्र या, संवाद साधा, असा जिव्हाळ्याचा संदेश देणारे प्रबोधनकार ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर यांचा अपघातात मंगळवारी सायंकाळी मृत्यू झाला. त्यांनी दिलेली ही मुलाखतच त्यांच्या विचारांची अखेरची प्रबोधनवाणी ठरली आहे. समाजातील तुटलेला संवाद हीच अधोगतीची सुरुवात असल्याचे त्यांनी सांगितले. जोपर्यंत माणसं एकमेकांशी बोलत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या मनात काय सुरू आहे, हे कळत नाही. संवाद तुटला की, समाज तुटतो आणि तुटलेल्या समाजातून क्रांती घडत नाही, असे विचार त्यांनी मांडले.

नांदेड येथे मंगळवारी शिव कुटुंब मेळावा पार पडला. हा मेळावा आटोपून प्रबोधनकार ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर हे दुचाकीने त्यांच्या बारूळ या गावी जात असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांनी मेळाव्यानंतर पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत दिलेला संदेश सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. बारूळकर महाराज म्हणाले, शिक्षण, आरोग्य, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील लोक एकमेकांच्या जवळ असूनही संवाद साधत नाहीत, ही खंत वाटते. त्यामुळे ‘शिव कुटुंब मेळावा’सारख्या कार्यक्रमांतून स्नेहभाव वाढतो, विचारांची देवाणघेवाण होते, असे ते म्हणाले.

परभणीत ऑटोरिक्षाने घेतला पेट

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : शहरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळा परिसरात बुधवारी सकाळी ११ ते ११:३० दरम्यान चालक ज्ञानेश्वर शंकरराव दामोधर (रा. पिंगळी) यांच्या ऑटो रिक्षाला आग लागली. प्रवासी ऑटोतून बाहेर पडले होते.

मात्र, घटनेत ऑटो जळून खाक झाला. वसमत महामार्गावर ऑटो रिक्षा (एमएच २२ एपी ३४४२) हा राजगोपालाचारी उद्यानाकडे जात असताना ऑटो रिक्षा पेटला.

नगरपंचायत कार्यालय शिरुर कासार

ता.शिरुर कासार, जि. बीड- 413249

ईमेल : npshirurkasar2015@gmail.com फोन नं.- 02444-259259

जा.क्र.2026/नपांशि/ दिनांक :- / / 2025

ई-निविदा क्र.-1,2,3 & 4 बांधकाम विभाग नगर पंचायत शिरुर कासार सन 2026-27

नगरपंचायत कार्यालय शिरुर कासार बांधकाम विभागांतर्गत शहरातील कामाच्या ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. 02/04/2026 सकाळी- 11:00 वाजेपासून ते दि.- 10/04/2026 दुपारी- 17:00 वाजेपर्यंत मिळतील.निविदेतील अटी व शर्ती सह इतर संपूर्ण तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी,
नगर पंचायत शिरुर कासार

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
५- बी. जे. रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११ ००१.

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२८४६/४७ Email Id-comm.audit.18@gmail.com

लेखापरीक्षक नामिकेसंदर्भातील सूचना

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१)(ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९(१)(फ) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणांसाठी सन २०२६-२०२८ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करण्यासाठी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या पोर्टलवर दिनांक **०६/०४/२०२६ ते २०/४/२०२६** या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाइन अर्जासंदर्भातील परिपत्रकीय सूचना सहकार विभाग / सहकार आयुक्त व निबंधक यांचे संकेतस्थळावर आणि सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, विभागीय सहनिबंधक यांचे कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.

शिक्का

स्वाक्षरी/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001

सीआयएन: U42202DL2025G01445416

जाहीर सूचना

एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेडच्या ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावरसूचना/हरकती मागविणे (प्रकरण क्र. 49/2026)

1. एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांनी विद्युत अधिनियम, 2003 मधील कलम 14 व 15 तसेच एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियमावली, 2004 अंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज आयोगाने दिनांक 30 मार्च 2026 रोजी ग्राह्य धरला असून, विद्युत अधिनियम, 2003 च्या कलम 15(2) अंतर्गत एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांना सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.
2. एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड ही कंपनी अंतर्गत राज्य ट्रान्समिशन प्रणाली उभारण्यासाठी विशेष उद्देश वाहन म्हणून स्थापन करण्यात आली आहे, ज्यामुळे नूतनीकरणीय ऊर्जेचा वीज पुरवठा सुरळीत व कार्यक्षम पद्धतीने वहन व प्रसारण होऊ शकेल. सीटीयुआयएल नुसार सुमारे 7 जीडब्ल्यू सौर ऊर्जेच्या अपेक्षित निर्मितीचा विचार करून ही प्रणाली उभारण्यात येत आहे. 400 केव्ही वाशी पूलिंग उपकेंद्र हे आगामी आरई निर्मिती पुणे व मुंबई येथील लोड सेंटर्सकडे वहन करण्यासाठी नियोजित करण्यात आले आहे, विशेषतः एआयएस वाशी हे पाटोदा, परांडा, भूम व कळंब या आरई समृद्ध क्षेत्रांचे मध्यबिंदू असल्याचा विचार करून. सदर प्रकल्प महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेड यांच्या मार्फत राबविण्यात आलेल्या टॅरिफ आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे प्रदान करण्यात आलेला आहे.
3. सदर प्रकल्पामध्ये 400 केव्ही स्तरावर 2x500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी आणि 2x315 एमव्हीए, 400/132 केव्ही आयसीटी तसेच 1x125 एमव्हीएआर बस रिॲक्टरसह वाशी उपकेंद्र (एसएस) उभारणीचा समावेश आहे. तसेच संबंधित लाईन्स व बे यांचा समावेश असून, 400 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 765/400 केव्ही एआयएस पुणे (पूर्व) (प्रस्तावित), 220 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 220 केव्ही एआयएस मांजरसुभा (विद्यमान), 220 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 220 केव्ही एआयएस परांडा (विद्यमान), 132 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही वाशी (नवीन) ते 132 केव्ही एआयएस कळंब (विद्यमान) यांचा समावेश आहे. तसेच मांजरसुभा (विद्यमान) व परांडा (विद्यमान) उपकेंद्रांवर 220 केव्ही बे, संबंधित जीआयएस व एआयएस लाईन बे यांसह, 765 केव्ही एआयएस पुणे (पूर्व) (नवीन) (प्रस्तावित) येथे 400 केव्ही लाईन बे (400 केव्ही डि/सी लाईनच्या टर्मिनेशनसाठी) तसेच 132 केव्ही एआयएस कळंब येथे 132 केव्ही लाईन बे (400 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 132 केव्ही एआयएस कळंब (विद्यमान) डि/सी लाईनच्या टर्मिनेशनसाठी) यांचा समावेश आहे.
4. अर्जदारास निविदा प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने संपादन केले असून, महाराष्ट्र राज्यामध्ये वरील अंतर्गत राज्य ट्रान्समिशन प्रणालीची उभारणी, संचालन व देखभाल करण्यासाठी ट्रान्समिशन परवाना मिळविणे आवश्यक आहे. त्यानुसार एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांनी ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठी अर्ज केलेला आहे.
5. आयोगाने एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांना या सूचनेद्वारे ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर सर्वसामान्यांकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. अर्जाची प्रत पाहणीसाठी किंवा खरेदीसाठी मिळविण्यासाठी संबंधित नोडल व्यक्तीचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:
   अ. **नाव:** श्री. वसंत कुमार पटेल
   ब. **अर्जाची प्रत पाहणीसाठी/खरेदीसाठी मिळविण्याचा पत्ता:** एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001
   क. **पाहणी/खरेदीची वेळ:** कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते सायं. 17:00 दरम्यान
   ड. सविस्तर अर्ज दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) सीडीसह रु. 100/- रोख किंवा "NES Dharashiv Transmission Limited" या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्ट/चेकद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.
   ई. अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी संकेतस्थळ: **www.mclindia.com**
6. प्रसिद्ध करण्यात आलेल्या या सार्वजनिक सूचनेच्या अनुषंगाने, कोणत्याही व्यक्तीस सूचना/हरकत नोंदवायची असल्यास त्यांनी इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात एमईआरसी च्या संकेतस्थळावरील 'E-Public Consultation' या टॅबद्वारे (www.merc.gov.in/e-public-consultation) सादर करावी. या सुविधेचा वापर करताना कोणतीही अडचण आल्यास संबंधित हितधारकांनी एमईआरसी कार्यालयाशी मोबाईल क्रमांक 8928071522 किंवा ईमेल आयडी suggestions@merc.gov.in वर संपर्क साधावा. संपर्काची वेळ सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते सायं. 05:00 अशी राहील.
7. ज्या व्यक्तींनी 'E-Public Consultation' टॅबवर सूचना/हरकती अपलोड केल्या आहेत, त्यांना त्यांच्या सादरीकरणाची हार्ड कॉपी सादर करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करता येत नाही, त्यांनी आपली सूचना/हरकत लेखी स्वरूपात **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), 13 वा मजला, सेंटर क्र. 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – 400005** या पत्त्यावर सादर करावी. तसेच **श्री. वसंत कुमार पटेल,** एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001, **ईमेल: bd@mclindia.com** यांना त्याची प्रत पाठविल्याचा पुरावा सादर करावा. सादरीकरणात पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, टपाल पत्ता व (असल्यास) ईमेल पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. 1 मे 2026 रोजी सायं. 5:00 नंतर प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. इतर कोणत्याही माध्यमातून सादर केलेल्या सूचना/हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.
8. एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांना प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकत/सूचनेवर प्राप्तीपासून तीन दिवसांच्या आत, परंतु 1 मे 2026 पर्यंत प्राप्त सर्व हरकत/सूचनांसाठी जास्तीत जास्त 4 मे 2026 पर्यंत उत्तर देणे बंधनकारक असेल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: 02 एप्रिल 2026

श्री. वसंत कुमार पटेल
संचालक